नवीन चंद्रपूरच्या विकासाला मिळणार आधुनिकतेची नवी झळाळी ; 'न्यू ग्रीन चंद्रपूर' साकारण्यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांचा पुढाकार!

नामांकित आर्किटेक्ट्सच्या मदतीने सुसज्ज, अत्याधुनिक आणि सुनियोजित विकास आराखडा तयार करण्याची आमदार मुनगंटीवार यांची मागणी

गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर यांच्या उपस्थितीत मंत्रालयात बैठक; ११४ नागरी सुविधा, रस्ते, सौरऊर्जा, पावसाचे पाणी संकलन यांसह विविध विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा

मुंबई - चंद्रपूरचा विकास करताना केवळ सध्याच्या गरजांचा विचार न करता पुढील अनेक दशकांचा वेध घेणारे दूरदृष्टीपूर्ण नियोजन व्हावे, यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार सातत्याने प्रयत्नशील आहेत. नवीन चंद्रपूरचा विकास हा केवळ म्हाडाची वसाहत उभारण्यापुरता मर्यादित न राहता, नागरिकांना सर्व आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध असलेले सुसज्ज, अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक शहर मिळावे, अशी त्यांची भूमिका आहे. याच भूमिकेतून मागील अधिवेशनात आ.मुनगंटीवार यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चेद्वारे नवीन चंद्रपूरच्या विकासाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित केले होते. त्यावेळी गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. पंकज भोयर यांनी मुंबईत संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हे प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आज मंत्रालयात त्यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत आमदार मुनगंटीवार यांनी नवीन चंद्रपूरच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबी सविस्तरपणे मांडल्या. मागील अधिवेशनात उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने बैठक आयोजित केल्याबद्दल त्यांनी राज्यमंत्री पंकज भोयर यांचे आभार मानले.

नवीन चंद्रपूरचा विकास आराखडा तयार करताना नामांकित आणि अनुभवी आर्किटेक्ट्सची मदत घेण्यात यावी, अशी मागणी आमदार मुनगंटीवार यांनी बैठकीत केली. शहराचा विस्तार, वाढती लोकसंख्या, वाहतूक व्यवस्था आणि भविष्यातील नागरी गरजा लक्षात घेऊन उच्च दर्जाचे, सुसज्ज आणि दीर्घकालीन विकास नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीत प्रस्तावित भूसंपादन क्षेत्राची यादी, रस्त्यांचे विस्तृत जाळे, ११४ अत्याधुनिक नागरी सुविधा, पावसाच्या पाण्याचे संकलन (रेन वॉटर हार्वेस्टिंग), सौरऊर्जेचा वापर, सुनियोजित झोनिंग आणि घरांच्या रचनेतील एकसमानता या विषयांवर चर्चा झाली. नवीन चंद्रपूरमधील नागरिकांना रस्ते, पाणी, वीज आणि इतर आवश्यक नागरी सुविधा योग्य पद्धतीने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विकास आराखड्यात या बाबींना प्राधान्य देण्याची आवश्यकता आमदार मुनगंटीवार यांनी अधोरेखित केली.

चंद्रपूर शहरातील प्रदूषणाची समस्या लक्षात घेता नवीन चंद्रपूरच्या उभारणीत पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देण्यात यावे, अशी भूमिका आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मांडली. शहरात विस्तृत हरित क्षेत्रांची निर्मिती, सौरऊर्जेचा अधिकाधिक वापर आणि पावसाच्या पाण्याचे संकलन यांसारख्या पर्यावरणपूरक सुविधांचा समावेश करून 'न्यू ग्रीन चंद्रपूर' विकसित करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. त्यांच्या या सूचनांना सकारात्मक प्रतिसाद देत राज्यमंत्री पंकज भोयर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना आणि नियोजन करण्याचे निर्देश दिले.

चंद्रपूरच्या विकासाबाबत आमदार मुनगंटीवार यांनी नेहमीच दीर्घकालीन विचार केला आहे. शहरातील पायाभूत सुविधांपासून आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि नागरी सोयीसुविधांपर्यंत प्रत्येक विषयाकडे त्यांनी विकासाच्या व्यापक दृष्टिकोनातून पाहिले आहे. नवीन चंद्रपूरच्या बाबतीतही हीच भूमिका त्यांनी घेतली असून, शहराचा विस्तार करताना भविष्यात नागरिकांना कोणत्याही मूलभूत सुविधांची कमतरता भासू नये, यासाठी त्यांचा विशेष आग्रह आहे.

या बैठकीला संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नवीन चंद्रपूरच्या विकास आराखड्यात चर्चेदरम्यान मांडलेल्या सूचनांचा समावेश करून पुढील कार्यवाही करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. नवीन चंद्रपूर हे आधुनिकतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा आदर्श निर्माण करणारे शहर व्हावे आणि 'न्यू ग्रीन चंद्रपूर'च्या माध्यमातून चंद्रपूरच्या भविष्यातील विकासाला नवी दिशा मिळावी, हा आमदार सुधीर मुनगंटीवार यांचा प्रयत्न आहे.